# प्रकरण - पहिले

---

# प्रस्तावना

# प्रकरण – पहिले

## प्रस्तावना

हिंदू-मुस्लिम प्रश्न निकालात निघावा म्हणून फाळणीचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अखंड हिंदुस्थानची फाळणी झाली. भारत आणि पाकिस्तान अशी दोन सार्वभौम राष्ट्रे निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. त्यामुळे भारतातील विभिन्न धार्मिक समुहांना लोकशाहीचे समान हक्क प्राप्त झाले. भारत हा अनेक बाबतीत विविधतेने नटलेला देश आहे. या विविधतेमध्ये एकता प्रस्थापित करण्यासाठी भारताने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचा स्वीकार केला. परंतु फाळणीमुळे हिंदू-मुस्लिम प्रश्न मिटले नाहीत तर अधिक गंभीर बनले. कारण दोन्ही समुदायातील जमातवादी आणि धर्मांध शक्तींनी परस्परांमध्ये कमालीचा आपपरभाव आणि द्वेष पोसला. त्यामुळे धर्मनिरपेक्ष भारतीय समाजव्यवस्था आणि देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेस धोका निर्माण झाला.

हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लिम जातीय सलोखा निर्माण व्हावा म्हणून प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची १९७० साली स्थापना केली. मुस्लिम जातीयतेचे स्वरूप जाणून घेत असताना त्यांना मुस्लिम समाजात धर्माच्या नावाने निर्माण झालेल्या अनेक कालबाह्य प्रथा, परंपरा दिसल्या. त्यामुळे त्यांनी इस्लामची चिकित्सा केली. मुस्लिम समाजाला या कालबाह्य गोष्टी सोडून देण्याचे त्यांनी आवाहन केले आणि ईस्लाम धर्मचिकित्सेचा पाया घातला. हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लिम दोन्ही समुदायातील सनातनी, प्रतिगामी शक्तीवर प्रखर टीका केली. मुस्लिम समाजाचे प्रतिगामीत्व वाढविण्यास तथाकथित प्रतिगामी राज्यकर्ता वर्ग जबाबदार आहे असा नवीन सिद्धांत त्यांनी मांडला. मताच्या राजकारणासाठी मुस्लिम समाजामध्ये कमालीचे प्रतिगामीत्व जोपासले गेले. असा त्यांनी आरोप केला. हमीद दलवाई हे बुद्धीप्रामाण्यवादी होते त्यांची मांडणी धर्मग्रंथावर आधारित नव्हती. जवळ-

जवळ चौदाशे वर्षापासून चालत आलेल्या कालबाह्य प्रथांना दलवाई यांनी प्रथमच आवाहन दिले. त्यामुळे मुस्लिम समाजातील परंपरावादी, प्रतिगामी लोक चिडले. दलवाईंनां बदनाम करण्याचे सर्व मार्ग त्यांनी अवलंबले.

हमीद दलवाई यांनी २२ मार्च १९७० रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम समाजाचे प्रबोधन करण्यासाठी त्यांना मंडळ स्थापन्याची गरज वाटत होती. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने स्थापनेपासून समाजप्रबोधन आणि राजकीय जागृतिचे महत्त्वपूर्ण कार्य केले. ईहवादी हमीद दलवाई यांना धर्म आणि राजकारण यांची सरमिसळ मान्य नव्हती. त्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार मांडले. ते आजही उपयुक्त आहेत.

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये हमीद दलवाई यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. हमीद दलवाई यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने जूबानी तलाक, समान नागरी कायदा, बहू-पत्नीत्व, परदा पद्धती, इस्लाम धर्म चिकित्सा, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता असे अनेक प्रश्न घेऊन जे समाज प्रबोधन आणि राजकीय जागृतिचे कार्य केले. त्या कार्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधात केला आहे. हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजातील वाढत्या जातीयवादी वृत्तीला आळा बसावा म्हणून ईस्लामची चिकित्सा केली. तसेच भारतातील मुस्लिम राजकारणाची चिकित्सा केली. भारताची फाळणी व स्वतंत्र भारतामध्ये निर्माण झालेल्या हिंदू-मुस्लिम प्रश्नांचा आढावा दलवाई ह्यांनी घेतला. त्यांच्या या विचारांचा परामर्श येथे घेण्यात आलेला आहे.

हमीद दलवाई यांना धर्मनिरपेक्षतेची मूल्ये समता, स्वातंत्र्य, न्याय इत्यादी लोकशाही मूल्यांइतकेच प्रिय वाटत होते. म्हणून त्यांनी मांडलेले राजकीय, सामाजिक तसेच धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारांना जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोध प्रबंधात केलेला आहे.

समकालीन भारतातील सामाजिक परिस्थिती पाहता कमालीचा जमातवाद वाढलेला आहे. हिंदू-मुस्लिम समाजात ज्या धर्मांध शक्ती कार्यरत आहेत त्यामुळे बाबरी मस्जिद, गुजरात मधील जातीय दंगली सारख्या माणूसकीला काळीमा फासणाऱ्या घटना घडल्या. आजच्या परिस्थितीच्या अनुषंगाने दलवाई यांच्या विचारांचे समकालीन औचित्य काय आहे हे तपासण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधप्रबंधात केलेला आहे.

अ)

## मुस्लिम समाजाचा ऐतिहासिक विकासक्रम

"इ.स. ६२६ मध्ये अरबांनी मुंबईजवळील 'ठाणे' या ठिकाणी स्वारी केली."[१] भारतामध्ये इस्लामचा प्रसार तेव्हा पासून सुरू झाला. भारतावर मुस्लिमांनी सत्तेची लालसा, धर्मप्रसार आणि संपत्तीची लूट इत्यादी हेतूने स्वाऱ्या केल्या. सत्तेसाठी मुस्लिम राज्यकर्ते परस्परांमध्ये लढले. इ.स. ७१२ ते ७१३ च्या सुमारास महंमदबीन कासीम ने भारतातील दाहिर राजास पराजीत केले आणि सिंध व मुलतान हा प्रदेश काबीज केला.

भारतामध्ये इस्लामच्या प्रसाराबद्दल तीन मतप्रवाह आहेत. "राजानूग्रह मिळावा म्हणून भारतातील उच्चभ्रू लोकांनी इस्लाम स्वीकारला. दुसरी गोष्ट इस्लामची शिकवण चांगली आहे. या खात्रीतून अनेक लोक इस्लाममध्ये दाखल झाले. तिसरी गोष्ट हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांच्या शोषणास कंटाळलेल्या दलित शोषित वर्गाने 'इस्लाम' स्वीकारला."[२] वरील तीन घटक इस्लामच्या प्रसारास कारणीभूत असले तरी, या मार्गाने इस्लामचा प्रसार म्हणावा तितका झालेला नाही. इस्लामच्या प्रसारामध्ये सुफी संतांची भूमिका महत्त्वाची आहे. दरवेश, फकीर, सुफी यांच्या साधेपणा व उदारमतवादी सेवाभावी वृत्तीकडे लोक आकर्षित झाले आणि त्यामूळे इस्लामचा प्रसार झाला.

"महंमदबीन कासीम नंतर अरब भारतात आले नाहीत. त्यानंतर आलेल्या मुसलमानांपैकी तुर्क, अफगाण आणि मोगल हे लोक होते."[३] महंमद गजनीने भारतावर इ.स. १००१ ते १०३० च्या कालखंडात सतरा स्वाऱ्या केल्या. गजनीनंतर मुहंमद घोरी ने भारतावर स्वारी केली. पुढे १२९० ते इ.स. १३२० पर्यंत अल्लाऊद्दीन खिलजीने दिल्ली येथे राज्यकारभार केला. बाबराने इब्राहिम लोदीला ठार करून सुलतानशाहीचा शेवट केला.

**मोगल कालखंड :**

"बाबर हा मोगल साम्राज्याचा संस्थापक होता. बाबरानंतर हुमायूँ व हुमायूँनंतर अकबर मोगल सम्राट बनला. अकबरने हिंदूस्थानात सहिष्णू धोरण स्वीकारले. धर्मश्रद्ध लोकांना पायबंद घातला. 'जिझिया' कर रद्द केला. शासनव्यवहारात हिंदूंना सामावून घेतले. म्हणून प्रसिद्ध "इतिहासकार सरदेसाई यांनी अकबराच्या सहिष्णू धोरणाचा गुणगौरव केला."[४] अकबर नंतर जहाँगीर याने १६०७ ते १६२७ या कालखंडात राज्यकारभार पाहिला. जहाँगीरनंतर शहाजहान इ.स. १६२२ ते १६५८ मध्ये सम्राट झाला. पुढे औरंगजेब १६५८ ते १७०७ मध्ये सम्राट बनला. त्याने भारतामध्ये बलप्रयोगाद्वारे धर्मप्रसार करण्याचा प्रयत्न केला. परंतू १७०७ मध्ये औरंगजेबच्या मृत्यूने संपूर्ण भारत इस्लाममय करण्याचे त्याचे स्वप्न धुळीस मिळाले. अखेर १८५७ मध्ये शेवटचा मोगल सम्राट बहादुरशाह जफर याचे राज्य ब्रिटिशांनी खालसा केले. आणि मोगल सत्ता संपुष्ठात आली. ब्रिटिशांनी आपली सत्ता हिरावून घेतली याचे खोल ठसे मुस्लिम समाजावर उमटले. मुस्लिम साम्राज्याचा हिंदूंच्या मानसिकतेवर परिणाम झाला. पुढे हीच मानसिकता अनेक घटनाक्रमाला कारणीभूत ठरली. प्रामुख्याने "भारताचा स्पेन झाला नाही तथापि अफगाणिस्तानही होवू शकला नाही. या विशिष्ठ इतिहासाचे खोल ठसे हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजाच्या मनावर उमटलेले राहिले. भारत इस्लाममय करण्याची प्रक्रिया अपूर्ण राहिली. या जाणीवेने धर्मनिष्ठ मुसलमानी मने भारली गेली. या जाणीवेतून पुढे आधुनिक इतिहासात देखील

मुसलमानी धार्मिक चळवळींनी जन्म घेतला. तर स्पेनप्रमाणे इस्लामची लाट आपण परतवू शकलो नाही ही खंत हिंदुत्ववादी चळवळींना जन्म देणारी ठरली.''[५]

१८५७ चा लढा असंख्य हिंदू-मुस्लिमांनी एकत्र येवून लढविला. ब्रिटिशांना हिंदू-मुस्लिमांच्या ऐक्याची जाणीव प्रथमच झाली. १८५७ नंतर मात्र ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लिम फूट पाडण्याची भेदनिती अवलंबली. कारण हिंदू-मुस्लिम ऐक्य ब्रिटिश साम्राज्याला घातक आहे हे त्यांनी जाणले. ब्रिटिशांनी १८५७ नंतर संपूर्ण भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले आणि भेदनितीला सुरूवात केली.

**ब्रिटिश आगमनाचे मुस्लिम समाजावर झालेले परिणाम :**

ब्रिटिश आगमनाचा मुस्लिम समाजावर परिणाम झाला. हस्तव्यवसाय बंद पडले. सत्ता ब्रिटिशांच्या ताब्यात गेली. प्रतिगामी / परंपरावादी मुस्लिम धर्मगुरूंवर परिणाम झाला.

**१ ) हस्तव्यवसाय बंद पडले -**

''सुफी संतांच्या प्रभावाने भारतातील दलित, पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या वर्गाने इस्लाम स्वीकारला. धर्म स्वीकारला तरी व्यवसाय बदलले नाहीत.''[६] ब्रिटिशांचे आगमन झाल्याने पारंपारिक व्यवसाय बुडाले, ''भारतातील ऐतद्देशीय हस्तव्यवसाय व उद्योगधंदे नष्ट करण्याचे ब्रिटिशांचे धोरण असल्याने लक्षावधी मुस्लिम विणकर, कोष्टी, मोमीन, रंगारी तसेच अन्य लोक आपल्या पिढीजात व्यवसायातून उठले. अनेकांना उपासमारीत जीवन कंठण्याची वेळ आली. मुसलमानांच्या या राजकीय व आर्थिक अध:पातामुळे या समाजात मध्यमवर्ग निर्माण झाला नाही.''[७]

**२ ) परंपरावादी मुस्लिम धर्मगुरू :**

मुस्लिम समाजातील प्रतिगामी धर्मगुरूंना मुस्लिम सत्तेच्या काळात राजाश्रय मिळत होता. परंपरागत मुस्लिम धर्मगुरू (उलेमा, मौलवी, आलीम) यांना भारतामध्ये इस्लामचा प्रसार हातातुन हिसकावून घेतली. ब्रिटिशांपूर्वी आपण राज्यकर्ते वर्ग होतो. आता आपल्याला ब्रिटिशांसमोर झुकावे लागेल, या जाणीवेने उलेमा मंडळी पछाडली गेली.

आब्बासी खलीफाच्या काळात साम्राज्यविस्ताराचे समर्थन करण्यासाठी ज्या 'दार-उल-हरब' आणि 'दार-उल-ईस्लाम' सारख्या संकल्पना उदयास आल्या. त्या संकल्पनांच्या आधारे भारतातील सत्ता आपल्या हातात नाही म्हणून हा प्रदेश 'दार-उल-हरब' बनलेला आहे. त्यास 'दार-उल-इस्लाम' बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे ही मंडळी म्हणू लागली.

"भारतातील इस्लामीकरणाची प्रक्रिया अपूर्ण राहिल्याच्या जाणिवेतून शाह वलिऊल्लाचा १८६५ मध्ये उदय झाला. वलीऊल्लापूर्वी सिरहिंदीसारखे धार्मिक नेते इस्लामच्या प्रसारासाठी सत्तेचा वापर करण्याची हाक देत होते. शाह वलीऊल्ला याने प्रथमच धर्माच्या पायावर, मुसलमानांना संघटित होण्याचे आवाहन केले."[८]

"हिंदुस्थानमध्ये उलेमांची धर्म आणि राजकारण या बद्दलची भूमिका वादग्रस्त आहे. इंग्रजी शिक्षणातून नवविचारांचे वारे वाहू लागल्यानंतर बहुसंख्य उलेमांनी ब्रिटिश विरोधी भूमिका घेतली. उलेमांनी बदललेल्या काळातील प्रश्नच समजून घेतला नाही. धर्मातील शब्दांनाच ते चिकटुन राहिले."[९]

**३ ) इंग्रजी ( आधुनिक शिक्षण ) :**

मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात शासन व्यवहाराची भाषा ही फारशीयन होती. ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्याने आधुनिक शिक्षणाची सुरूवात भारतामध्ये झाली. ठिकठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा निघाल्या. त्यामूळे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार वाढू लागला. ब्रिटिशांनी शासनव्यवहाराची भाषा इंग्रजी ठरविली. त्यामुळे फारशीयन भाषेचे शासनव्यवहारातून उच्चाटन झाले. असे झाल्याने परंपरावाद्यांना ही धर्मातील आणि मुस्लिम समाजातील लूडबूड वाटू लागली, म्हणून ह्या मंडळीनी ब्रिटिशांनी आणलेल्या अनेक सुधारणांचा विरोध केला. इंग्रजी शिक्षणापासून मुस्लिम समाजाला परावृत्त करण्याचे काम उलेमांनी केले. फारशीयन भाषेचे उच्चाटन झाल्याने मुस्लिम धर्मनिष्ठ मंडळी धर्म बुडतो की काय या भितीने ग्रस्त झाले.

मुस्लिम प्रतिगामी धर्मगुरूंनी मध्ययुगीन कालबाह्य, प्रथा परंपरांना आधुनिक समाजाला जशाच्या तशा कलम करण्याचा जो प्रयत्न केला त्याचा परिणाम हा समाज इंग्रजी शिक्षणापासून दूर राहिला. परिणामी मुस्लिम समाजातील आधुनिकतेमध्ये तो एक अडथळा बनला. समाजाचे मागासलेपण वाढत गेले.

**४ ) जमीनदारी बुडाली :**

मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात बंगालसारख्या प्रदेशात मोठे मुस्लिम जमीनदार होते. हे अभिजन जमीनदार ब्रिटिश साम्राज्यामुळे संपुष्टात येऊ लागले. कॉर्नवालीसच्या कायमधारा पद्धतीमुळे नवीन आर्थिक संरचना उदयास येऊ लागली. जमीनदारांना या परिस्थितीशी जुळवून घेता न आल्याने पुढे वहाबी आंदोलन उदयास आले.

**वहाबी आंदोलन -**

वहाबी आंदोलन अरबस्तानात प्रथम उदयास आले. ही चळवळ मुहंमद इब्ने अब्दुल वहाब याने १७व्या शतकात अरबस्तानात सुरू केली. वहाबी आंदोलन हे मूलतत्ववादी आणि पुनरूज्जीवनवादी मुस्लिम चळवळ होती. इस्लामी मूलतत्ववादी चळवळीतील ही सर्वात प्रभावशाली चळवळ होय. "वहाबी कट्टर शरियतपंथी होते. पथभ्रष्ट मुसलमानांना लुटने, आणि त्यांची हत्या करणे एवढेच नव्हे तर, महंमद पैगंबरांच्या स्मारकाची तोड-फोड करण्यातही ते मागे राहिले नाहीत. इ.स. १८०१ मध्ये व नंतर बरेच वर्षे वहाबी मुहंमद इब्ने सौदच्या नीतीने मुस्लिमांचे पवित्र स्थान करबला आणि मक्का व मदीनेमध्ये तोड-फोड केली. अरबस्तानात तीर्थयात्रेस गेलेल्या मुसलमानांच्या माध्यमातून वहाबी विचारधारा भारतामध्ये आली."[१०]

भारतामध्ये वहाबी चळवळ "१८५७ च्या चळवळी नंतर मुसलमानामध्ये वहाबी चळवळ उदयास आली. वहाबींनी उत्तर भारतात सशस्त्र कारवाया केल्या, इंग्रजी राजवटीमुळे भारत हा शत्रूचा (दार-उल-हरब) बनलेला असून त्या विरूद्ध उठाव केला पाहिजे अशी वहाबींनी भूमिका घेतली. परंतु इंग्रजांनी वहाबींना कठोरपणे दडपले."[११]

"कॉर्नवॉलीसने सुरू केलेल्या कायमधारा पद्धतीमुळे भारतीय समाजाची मूलभूत संरचनाच- बदलून गेली. जमीनदारांचा एक नवा वर्ग निर्माण झाला. त्यांच्यातील असंतोष वहाबी बंडाच्या मार्फत बाहेर पडलेला दिसतो. १९व्या शतकातील भारतीय इतिहासातील ब्रिटिशांविरूद्धच्या लढ्यामधील प्रभावी ठरणारी पहिली सुसंबद्ध व दीर्घ अशी महत्त्वाची ही चळवळ होती."[१२]

भारतातील वहाबी आंदोलनाचा रोख ब्रिटिश विरोधी होता. हिंदू विरोधी वहाबींचे आंदोलन नव्हते. भारतातील वहाबी आंदोलनास अरबस्तानातील वहाबी विचारधारेचा वारसा असला तरी, भारतातील तीचे स्वरूप अरबस्तानाप्रमाणे कट्टर आणि इतके मुलतत्ववादी नव्हते.

प्रामुख्याने १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिशांनी भारतामध्ये हिंदू-मुस्लिम भेद नीतीचा अवलंब सुरू करून हिंदू-मुस्लिम सुप्त संघर्ष निर्माण करण्यास सुरूवात केली. कारण त्यांना भारतामध्ये साम्राज्यविस्तार करून सत्ता टिकवायची होती. अशा परिस्थितीमध्ये सर सय्यद अहमद सारखे मुस्लिम अभिजनवादी नेतृत्व उदयाला आल्याचे दिसते. सर सय्यद यांची भूमिका जरी उदारवादी असली तरी, शेवटी ते ब्रिटिशधार्जिने बनत गेलेले दिसतात. सर सय्यद अहमद यांची भूमिका जरी वेगळ्या राष्ट्राच्या मागणीची नसली तरी, त्यांच्या भूमिकेमध्ये मुस्लिम अलगतावादाचा दर्प होता. म्हणून त्यांच्या भूमिकेचा परामर्श घेणे गरजेचे आहे.

**सर सय्यद अहमद यांची भूमिका :**

सर सय्यद अहमद यांनी अलिगढ कॉलेजच्या माध्यमाने मुस्लिम अभिजनांची चळवळ उभी केली. त्याकाळी धर्मांध मुस्लिम धर्मगुरू मुस्लिम समाजास इंग्रजी शिक्षणापासून दूर राहण्याचा सल्ला देत होते. नेमक्या त्याचवेळी सर सय्यद अहमद यांनी विरूद्ध भूमिका घेतली. मुस्लिम समाजाने आधुनिक इंग्रजी शिक्षण घेवून ब्रिटिशांकडून फायदा करून घेतला पाहिजे असे ते म्हणू लागले. "सर सय्यद अहमद यांना १८५७ च्या उठावाला आलेले 'जिहाद' चे स्वरूप मान्य नव्हते. सर सय्यद हे उदारमतवादी विचारसरणीचे होते."[१३]

सर सय्यद अहमद १८८४ पूर्वी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. मात्र राष्ट्रसभेच्या (१८८५) स्थापनेनंतर त्यांच्या भूमिकेत बदल झाला. १८८४ पूर्वी ते म्हणतात. "शिक्षणाच्या अभावी मुस्लिम समाज दिवसेंदिवस अवनत होत आहे. शाळा कॉलेजचा फायदा घेण्यापासून तो वंचित राहत आहे. कारण धार्मिक माथेफिरूपणाच्या आहारी तो गेला आहे. या आधुनिक शिक्षणाच्या संदर्भात हा मुसलमान हा हिंदू असा भेद करणे व्यर्थ आहे. गुणवत्तेच्या निकषावरच या क्षेत्रातील बऱ्या वाईटाचा विचार करावा लागेल. हिंदू आणि मुसलमान हे मला माझ्या दोन डोळ्यासारखे वाटतात."[१४]

"सर सय्यद अहमद हे हिंदी मुसलमानांचे पहिले पुढारी होते. १८८४ साली गुरूदासपूर येथे केलेल्या भाषणात हिंदुस्थानातील हिंदू व मुसलमान हे धर्माने भिन्न असले तरी राष्ट्र या दृष्टिने ते एकच आहेत. इतकेच नाही तर, हिंदुस्थानातील ख्रिस्ती हे सुद्धा राष्ट्रदृष्टीने हिंदीच आहेत."[१५]

१८८५ पर्यंत सर सय्यद यांची भूमिका हिंदू-मुस्लिम ऐक्याची होती. १८८५ पर्यंत सर सय्यद यांची भूमिका आणि राजकारण त्यांचे स्वत:चे होते. अलीगढ कॉलेज चे प्राचार्य थ्योरोडो ब्रेग तसेच मारिसन आणि आर्ची बोल्ड यांचा सर सय्यद अहमद यांच्यावर प्रभाव होता. या त्रिकुटांनी हिंदू-मुस्लिम दुहीची बीजे पेरली. "सर सय्यद अहमद मुस्लिम समाजाचे आद्य प्रवर्तक होते. असे झकेरिया यांचे मत आहे. परंतु समान भागीदारी मिळत असेल तर आम्हाला भारतात राहण्यास हरकत नाही अशी भूमिका सर सय्यद अहमद पासून जीना पर्यंतच्या अनेक मुस्लिम नेत्यांनी घेतलेली होती. लोकनियुक्त प्रातिनिधिक सरकार आल्यास भारतामध्ये हिंदूंचे वर्चस्व वाढेल. मुस्लिमांना दुय्यम स्थान मिळेल. राष्ट्रीय काँग्रेस हिंदूंचे संघटन आहे. ब्रिटिशांची राजवट कायम रहावी अशी भूमिका सर सय्यद यांची होती. असे मत प्रा. वसंत पळशिकर यांचे आहे."[१६] "सर सय्यद अहमद यांची भूमिका व मन मध्ययुगीन संरजामदारी होते असे म्हणणे गैर आहे. परंतु सर सय्यद अहमद यांची चिंता उत्तर भारतातील अश्रफ मुसलमानांच्या भवितव्याची होती असे म्हणता येते या वर्गाच्या पुनरूत्थानाचे मुख्य प्रवर्तक होते असे म्हणता येईल."[१७]

अर्थात सर सय्यद अहमद यांनी मुस्लिम समाज सुधारणेबद्दल घेतलेली भूमिका रास्त होती. परंतु त्यांची चळवळ केवळ राजकीय चळवळ बनून राहिली. इस्लामची चिकित्सा त्यांनी टाळली. स्त्रियांचे प्रश्न त्यांनी पाहिले नाहीत. सर सय्यद अहमद यांनी पूर्वीच भूमिका बदलून हिंदू-मुस्लिम अलगतावादाला चालना दिली. त्यामुळे फाळणीची बीजे रूजली असे म्हणायला हरकत नाही. त्यांच्या भूमिकेत ब्रिटिश धार्जिनेपणाचा दर्प होता. मात्र उत्तर भारतीय अभिजन मुस्लिमांमध्ये ते लोकप्रिय ठरले.

**भारताच्या फाळणीचा इतिहास आणि स्वतंत्र भारतामधील मुस्लिमांच्या समस्या :**

भारताची फाळणी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील विविध राजकीय घडामोडीचा परिणाम आहे. भारताची फाळणी एका रात्रीत घडलेली घटना नसून त्याला प्रदिर्घ ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. १८५७ नंतर मुस्लिम सत्ता ब्रिटिशांनी हिरावून घेतली. मुस्लिम धार्मिक चळवळीचा उदय या पार्श्वभूमीवर झाला. १८५७ च्या उठावात हिंदू-मुस्लिम एकत्र येऊन लढले. १८५७ नंतर ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लिमांबद्दल भेदनीती अवलंबली. अशा परिस्थितीत सिरहिंदी, शाह वलीऊल्ला (१७६५) सारख्या मुस्लिम धार्मिक नेत्यांनी मुस्लिमांना धार्मिक पायावर ब्रिटिशांविरूद्ध उभे करण्याचा प्रयत्न केला. मुस्लिम अलगतावादाची बीजे त्यामध्ये होती. पुढे सर सय्यद यांनी ब्रिटिश धार्जिनेपणा स्वीकारला, १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्र सभेला त्यांनी हिंदूची सभा म्हणून घोषित करण्यास सुरू केले. मुस्लिम अलगतावादाची जमातवादाची प्रवृत्ती त्यातून बळावत गेली. जमाते इस्लामी, अहरार, तबलीग, तंजीम, जमायत-ए-उलेमा इत्यादी संघटनांनी मुस्लिम अलगतेवर भर दिला.

१९१६ साली लखनौ येथे टिळकांनी लखनौ करार केला. लखनौ करारान्वये टिळकांनी मुस्लिमाना प्रतिनीधित्व दिले. मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व देऊन स्वातंत्र्य लढ्यात मुस्लिमांना मोठ्याप्रमाणात सामील करून घेण्याची रास्त भूमिका टिळकांची होती. परंतु मागणी केल्यानंतर झुकते माप मिळते याची जाणीव मुस्लिम धार्मिक नेत्यांना झाल्यामुळे मुस्लिम अलगतावाद वाढत गेला. खिलाफत चळवळीला धार्मिक

वळण मिळाले. खिलाफत चळवळीचा जोर ओसरल्यानंतर त्यातून मुस्लिम लीगच्या स्थापनेला पोषक वातावरण निर्माण झाले. १९०६ साली मुस्लिम लीगची स्थापना झाली. मुस्लिम लीगचे धोरण संकुचित होते. सौदेबाजी करत सत्तेमध्ये जास्त वाटा मागण्याचे धोरण मुस्लिम लीगचे दिसते. १९२० साली संपूर्ण काँग्रेस गांधीजींच्या बाजूने उभी राहिली. जीनांची महत्वकांक्षा व पुढचे राजकीय भविष्य जीनांना धोक्याचे वाटत होते. म्हणून ते काँग्रेस मधून बाहेर पडले. आणि मुस्लिमांचा पाठिंबा मिळविण्यच्या प्रयत्नात लागले.

१९३५ ला प्रांतीक स्वायत्तता देणारा कायदा झाला. राज्यांना मर्यादित अधिकार त्यामुळे उपभोगता येणार होते. काही मर्यादित मतदारसंघावर आधारित निवडणूका होणार होत्या. अशा परिस्थितीत १९३७ च्या निवडणूका झाल्या. निवडणूकांत जीनांना अपयश आले. त्यामुळे मुस्लिम समाजाचा पाठींबा मिळविण्यासाठी आणि आपले अस्तित्व टिकविण्यासाठी मुस्लिमांच्या धार्मिक भावना चेतविण्याचे जीनांनी ठरविले. जीना हिंदू-मुस्लिम अलगतावाद जोपासू लागले. १९३९ साली काँग्रेस मंत्रीमंडळाने राजीनामा दिला त्यावेळी जीनांनी मुस्लिम समाजाला 'मुक्तीदिन' पाळण्याचे आवाहन केले. त्यानंतर जीना मुस्लिम समाजाला हिंदू वर्चस्वाची भीती दाखवून जमातवादी प्रवृत्ती जोपासु लागले.

१९४० मध्ये लाहोर येथे मुस्लिम लीगचे अधिवेशन भरले. या अधिवेशना प्रसंगी सुद्धा जीनांनी भाषणातून मुस्लिम अलगतावादावर भर दिला. आणि याच अधिवेशनात मुस्लिम बहुसंख्यांक असलेल्या राज्यांचे मिळून वेगळे राष्ट्र व्हावे असा ठराव मंजूर झाला. १९२३ मध्ये स्वा. सावरकरांनी **'Hindutwa'** ग्रंथ लिहिला. पुढे १९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जहाल हिंदुत्ववादी संघटना होती. हिंदू राष्ट्राची निर्मिती आणि मुस्लिम द्वेष पसरविणे इत्यादी या संघटनेची उद्दिष्ट्ये होती. त्यामुळे हिंदू-मुस्लिम समुदायात परस्पर विरोधी वातावरण निर्माण होत होते. अशामध्ये जीना सारख्या तथाकथीत धर्मनिरपेक्ष नेतृत्त्व मुस्लिम अलगतावादावर भर देत होते.

लॉर्ड डफरिन यांनी हिंदुस्थानात हिंदू-मुसलमान अशी दोन राष्ट्रे नांदत आहेत असा द्विराष्ट्रवादाला पोषक युक्तीवाद मांडला. "हिंदू-मुस्लिम धर्म, संस्कृति, श्रद्धा, परंपरा, इतिहास, चालीरिती या दृष्टीने कसे भिन्न आहेत हे दाखविणारे पुरावे जसे लॉर्ड डफरीन यांनी दिले. तसे पुरावे जनाब जीना व स्वा. सावरकरांनाही सापडले नाहीत असे आचार्य जावडेकर यांचे मत आहे."[१८]

३० डिसेंबर १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाली. मुस्लिम लीगने हिंदू-मुस्लिम अलगतावाद जोपासला. १९३७ च्या निवडणूकात जिनांच्या अस्तित्वाला धक्का बसला. १९४० मध्ये लाहोर येथील मुस्लिम लीगच्या अधिवेशनात जीनांनी मुस्लिम अलगतावादावर भर दिला. "जीनांनी समान भागीदारीची मागणी केली. प्रथम त्यांनी ३३% जागा नंतर ५०% ची समान भागीदारी (सत्तेमध्ये) ची मागणी केली ती नाही मिळाल्यास आम्हाला स्वतंत्र राष्ट्र हवे अशी जीनांनी भूमिका घेतली."[१९] "मुस्लिम अंजूमनचे अध्यक्ष सरदार महंमद गुलाखान यांनी मुस्लिम बहुसंख्यांकाचे वेगळे राष्ट्र व्हावे अशी मागणी केली. हिंदू-मुस्लिम ऐक्य कधी होणार नाही असे त्यांनी सांगीतले."[२०]

इ.स. १९३४ मध्ये इंग्लंडमध्ये शिकणाऱ्या चौधरी रहिमत अली याने **'Now or Never'** या शिर्षकाखाली पुस्तिका काढली. त्यामध्ये त्याने प्रथम 'पाकिस्तान' हा शब्द उच्चारला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या **'Hindutwa'** या ग्रंथामध्ये मुस्लिम परकीय आहे. मुसलमानांची पुन्यभू, पितृभू भारत नाही असे मत मांडले. हिंदू-मुस्लिम समाजातील धर्मांध शक्तीमुळे जातीयवादी दंगली घडल्या. हिंदू-मुस्लिम समाजातील जमातवादी प्रवृत्ती, कमालीचा आपपरभाव, ब्रिटिशांची भेदनीती, हिंदू-मुस्लिम समाजातील सुशिक्षित बुद्धीजीवी वर्गाने पसरविलेला हिंदु-मुस्लिम द्वेष यामुळे शेवटी फाळणीचा निर्णय घेण्यात आला.

**स्वतंत्र भारतामध्ये मुस्लिम समाजाच्या समस्या :**

फाळणीनंतर जे मुस्लिम भारतात राहिले काही अभिजन वगळता बहुसंख्य मुस्लिम पारंपारिक तुटपुंजी व्यवसायामध्ये गुतलेले आहेत. फाळणीनंतर मुस्लिम समाजाला जवळ जवळ १५ ते २० वर्षे फाळणीचे गुन्हेगार म्हणून पाहण्यात आले. त्यामुळे मुस्लिम समाजामध्ये अकारण असुरक्षितता वाढत गेली. "अबिद हुसेन यांच्या मते १८५७ पेक्षा १९४७ च्या भारताच्या फाळणीने इथल्या मुस्लिम समाजावर गंभीर परिणाम केले आहेत."[२१] मुस्लिम समाजातील मागासलेपण, दारिद्र्य, निरक्षरता, हिंदू समाजातील संघ परिवारासारख्या हिंदू समाजातील वाढती धर्मांधता, इत्यादी समस्यांना द्यावे लागले.

स्वतंत्र भारतामध्ये मुस्लिम समाजाला योग्य दिशेने घेऊन जाणारे योग्य नेतृत्व **(Proper Leadership)** मिळाले नाही. "मुस्लिम समाजाला लाभलेले नेतृत्व विशेषत: धार्मिक नेतृत्व (काही सन्माननीय वगळता) यांना मुल्ला मौलवींना धार्मिक रूढी, परंपरा यापलीकडे त्यांना काही सुचले नाही. सर्व राजकीय सामाजिक प्रश्न धर्माच्या आधारे सोडविण्याचा प्रयत्न या नेतृत्वानी केला. त्यामुळे या सामाजाची फसवणूक झाली."[२२]

"मुस्लिम समाजात निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. धर्मनिरपेक्षतेकडे वाटचाल करण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे साधन नाही असे आलीम वकिल यांचे मत आहे. त्यांच्या मते मेडिकल आणि इंजिनियरिंग या विद्यमान लोकप्रिय शाखामध्ये मुसलमानांचे ४% इतके सुद्धा प्रमाण नाही. १९७१-८० च्या दरम्यानच्या आकडेवारीनुसार मुस्लिमांच्या रोजगारातील वाटा २% इतका आहे. काही राज्यांच्या कार्यालयात ते प्रमाण ६% ते १०% इतके आहे. १९७१-८० दशकात अल्पसंख्यांक आयोगाने मुस्लिम रोजगारीच्या परिस्थितीचे केलेले चित्रण विचित्र विदारक आहे. प्रथम श्रेणीत मुस्लिमांची शेकडेवारी. १.६१% (३६/२२३२) एवढी आहे. द्वितीय श्रेणीत ही



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

शेकडेवारी थोडीशी वाढलेली दिसते ती ३% (१२२/४०६०) इतकी तर तृतीय श्रेणीतही या परिस्थितीत फारशी वाढ नाही. ती ४.४१% (२२९४/५२००) पर्यंत आहे."[२३]

मुस्लिम समाजातील मागासलेपणा, निरक्षरता, परंपरावादी धर्मांध मुल्ला मौलवींचे प्राबल्य आणि मुस्लिम समाजामध्ये अकारण वाढलेली असुरक्षितता या समस्या मुस्लिम समाजासमोर आहेत. मुस्लिम समाज देशभर विखूरलेला आहे. राजकारणातील शुद्ध सौदे क्षमता आणि राजकीय जागृतिचा अभाव या समाजात दिसतो.

**मुस्लिम सामाजाची स्थिती :**

भारतातील मुस्लिम समाजाची स्थिती जाणून घेताना, दोन गोष्टींचा विचार करावा लागतो. पहिली गोष्ट मुस्लिम समाजाच्या राष्ट्रीयतेबद्दल विशेषतः संघ-परिवाराने निर्माण केलेले प्रश्न आणि दुसरी गोष्ट मुस्लिम समाजाच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न कारण मुस्लिम समाजाच्या आधुनिकीकरणाची गरज आहे. कारण हा समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात मागासलेला आहे. त्यांच्या आधुनिकीकरणा पुढेही बऱ्याच समस्या आहेत.

१) मुस्लिम समाजाच्या राष्ट्रीयतेबद्दल निर्माण केलेले प्रश्न :

"स्वा. सावरकर यांनी 'Hindutwa' या शिर्षकाखाली ग्रंथ लिहिला. त्यांनी हिंदु राष्ट्राची संकल्पना मांडली. त्यामध्ये सिंधू नदीपासून सिंधू सागरापर्यंत पसरलेल्या या भूमिचा वारसा पितृपरंपरेने ज्याला लाभला आणि ज्यांचा धर्म या देशात जन्मला आणि विकसीत झाला तोच स्वतःला हिंदू म्हणवू शकतो. आणि तोच हिंदू राष्ट्राचा नागरिक होवू शकतो."[२४] स्वा. सावरकरांच्या या व्याख्येत मुस्लिम कुठेच बसत नाहीत त्यामुळे या व्याख्येनुसार भारताला हिंदू राष्ट्र जाहिर केल्यास मुस्लिम या हिंदू राष्ट्राचे नागरिक होत नाहीत. ते परके ठरतात. स्वा. सावरकरांच्या विचारांचा वारसा घेवून पुढे संघ परिवाराचा जन्म झाला. आणि मुस्लिम समाजाच्या राष्ट्रीयतेबद्दल प्रश्न उपस्थित केले.

१९२५ मध्ये डॉ. हेडगेवार यांनी 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या जहाल हिंदुत्ववादी संघटनेची स्थापना केली. या संघटनेचे मुख्य उद्दिष्ठ सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या माध्यमाने हिंदू राष्ट्राची निर्मिती करणे हे आहे. त्यानंतर विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, रामराज्य परिषद इत्यादी संघ विचारसरणीला साम्य असणाऱ्या हिंदुत्ववादी संघटना निर्माण झाल्या. त्या सर्वांना संघ परिवार म्हणून संबोधिले जाते. मुस्लिम द्वेष आणि हिंदू राष्ट्राची निर्मिती या मुद्यावर या सर्वांचे ऐक्य आहे. "मुस्लिमांची धर्मस्थळे परराष्ट्रात आहेत. त्यांची (मुस्लिमांची) श्रद्धास्थाने तिथे असल्याने ते भारताशी एकनिष्ठ नाहीत. त्याचबरोबर मुस्लिम राष्ट्रद्रोही परकीय आहेत. ते हिंसक आहेत. 'इस्लाम' हा राष्ट्रवादाविरोध मानवतावादाविरोधी आहे असा चुकीचा प्रसार करून हिंदूंमध्ये मुस्लिम द्वेष पसरविला आणि मुस्लिमांच्या राष्ट्रीयतेचा प्रश्न निर्माण केला."[२५] त्यामुळे जातीवाद वाढला. मुस्लिम समाजातही हिंदू द्वेष वाढत गेला.

२) <u>मुस्लिम समाजाच्या आधुनिकीकरणाचा प्रश्न</u> :

मुस्लिम समाजात आधुनिकीकरणाची गरज आहे. कारण सर्वच बाबतीत राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात कमालीचा मागासलेपणा या समाजात आहे. मुस्लिम धार्मिक नेत्यांनी मुस्लिम समाजामध्ये सतत प्रतिगामीत्व पोसण्यावर भर दिलेला आहे. धर्मचिकित्सा असो, अथवा भाषेचा प्रश्न असो नेहमी प्रतिगामी भूमिका ही मंडळी घेताना दिसतात. भारतीय मुस्लिमांची भाषा उर्दू नसताना सुद्धा हे लोक उर्दूचा अनाठायी आग्रह धरतात. मुस्लिम व्यक्तीगत कायद्यामधील कालबाह्य गोष्टी टाकून देण्यास ते तयार नसतात. प्रत्येक सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोनाची गरज असते परंतू ही मंडळी प्रत्येक सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी नेहमीच धर्मशास्त्रांचा आधार घेतात. आजच्या परिस्थितीत सर्व प्रश्न सोडविण्यास धर्मशास्त्रे थिटे पडतात. परंतु मुस्लिम प्रतिगामी धार्मिक नेते मध्ययुगीन मिथके उभा करून स्वप्नरंजनात रमताना दिसतात. परिणामी मुस्लिम समाजाच्या आधुनिकतेकडील वाटचालीत अडचणी येतात. हे प्रतिगामीत्व म्हणजे समाजाची दिशाभूलच ठरते.

मुस्लिम समाजाच्या तुलनेत हिंदू समाज अग्रेसर आहे कारण हिंदू समाजात समाजप्रबोधन चळवळीचा इतिहास जवळ जवळ सत्तर वर्षे आधी सुरू झाला. या समाजाने बदलत्या काळानुसार आधुनिक शिक्षण घेतले. धर्मचिकीत्सेला वाव दिला. अर्थात धर्मचिकित्सेला विरोध झाला नाही असे नाही.

मुस्लिम समाजामध्ये अनेक कालबाह्य प्रथा आहेत उदा. पऱ्दा पद्धती, बहुपत्नीत्व, कुटुंबनियोजनाबद्दल अनास्था, जुबानी तलाक (स्वैर घटस्फोट) इत्यादी बंद करून या समाजाने बदलत्या काळानुरूप नवीन दृष्टीकोन स्वीकारावा लागणार आहे. शिक्षणाशिवाय हे शक्य होणार नाही.

मुस्लिम समाजाला निश्चित नेतृत्व नाही. देशात हा समाज विखुरलेला असल्याने प्रत्येक राज्यातील मुस्लिमांचे प्रश्न भिन्न-भिन्न आहेत. राजकीयदृष्ट्या जागृतीचा अभाव असल्याने राजकीय व्यवस्थेसमोर योग्य मागण्यांचा पाठपूरावा करण्यास हा समाज मागे पडतो, राजकीय क्षेत्रात मुस्लिम समाजाचा सहभाग कमी आहे. दुसरी गोष्ट "भारतात हिंदू धर्मीय आहेत तसेच मुस्लिम धर्मीयही आहेत. त्यांचा इस्लामची म्हणजे इस्लामच्या धर्माचरणाशी निश्चित संबंध आहे. पण पाकिस्तान, बांग्लादेश, सौदी अरेबिया, इराण, इराक, मलेशिया, इंडोनेशिया इ. राष्ट्रांशी त्यांचा काही संबंध नाही. कारण भारतीय मुस्लिम हे मूळचे हिंदू समाजातील निम्न शोषित उपेक्षित विभाग अहेत. पुरोहितशाही आणि जमीनदारी छळापासून मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी सातव्या शतकापासूनच धर्मांतर केल्याचा इतिहास आहे. एकूण मुस्लिम धर्मीय समाजातील आजच्या मुसलमानात अशा श्रमजीवितांचे प्रमाण ९०-९५% आहे."[२६] या भारतीय श्रमजीवी वर्गाने इस्लाम धर्म स्वीकारला परंतु पारंपारिक व्यवसाय बदलले नाहीत. हा समाज बहुसंख्येने दुरूस्तीवजा, तुटपुंजी कामे व मोलमजूरी करतो. या सामाजात अभिजन वर्ग आहे परंतू इतका मोठा नाही. या सामाजात मध्यमवर्गाचे प्रमाण अत्यल्प आहे. मुस्लिम समाजाची राजकीय व सामाजिक स्थिती बिकट आहे.

**मुस्लिम समाजाच्या आधुनिकीकरणातील अडथळे :**

मुस्लिम समाज मागासलेला असल्याने त्या समाजाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थिती सुधारणे गरजेचे आहे. कारण देशाच्या विकासातील ही स्थिती मोठी अडचण आहे. हा समाज सर्वात मोठा अल्पसंख्य असल्याने विकासाच्या प्रवाहात या समाजाचे आधुनिकीकरण सर्वच दृष्टीने गरजेचे आहे. परंतू या समाजाच्या आधुनिकीकरणामध्ये अनेक अडचणी आहेत.

१) प्रतिगामी मुस्लिम धर्मगुरू :

मुस्लिम समाजातील प्रतिगामी उलेमा मंडळी मध्ययुगीन मिथके उभी करून या समाजाची दिशाभूल करतात. त्यापाठीमागे त्यांचे व्यक्तीगत स्वार्थ दडलेले असतात. धर्माच्या नावाखाली पोटभरू उलेमा निर्माण झालेले दिसतात. धर्माच्या खऱ्या तत्वांना न सांगता भ्रामक कल्पनामध्ये ही मंडळी स्वत:ही रममान होतात आणि समाजातही परंपरावाद जोपासतात. त्यामुळे मुस्लिम समाजामध्ये बदलत्या काळानुसार बदल स्वीकारण्याची म्हणावी तितकी मानसिकता दिसत नाही. प्रतिगामी उलेमा मंडळी खरे पाहता या समाजाच्या आधुनिकतेत अडथळा आहे.

२) प्रतिगामी मुस्लिम धार्मिक आणि राजकीय नेतृत्व :

"मुस्लिम समाजाला लाभलेले असे नेतृत्व विशेषत: धार्मिक नेतृत्व, सनातनी मुल्ला-मौलवींना धार्मिक रूढी, परंपरा, त्यांचा आचार यापलीकडे काही सुचत नाही. आजच्या संमिश्र गुंतागुंतीच्या जीवनातील प्रश्न केवळ धर्मशास्त्राच्या आधारे सोडविण्याचा प्रयत्न ते करतात. सातव्या शतकाकडे डोळे लावून बसलेले मुस्लिम धार्मिक नेतृत्व मुस्लिम समाजाला नवी दिशा दाखवू शकत नाहीत."[२७] १९५५ मध्ये माजी पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी हिंदू सनातन्यांना न जुमानता 'हिंदू कोड बील' पास केले. त्यामुळे हिंदू स्त्रीयांना न्याय हक्क प्राप्त झाले. मुस्लिम समाजामध्ये असे कायदे स्वीकारण्याची मानसिकता निर्माण झाल्यानंतर अशाप्रकारचे कायदे करण्यात येतील

असे आश्वासनही त्यावेळी देण्यात आले. परंतु आजमितीपर्यंत कोणत्याही राजकीय नेत्यांनी मुस्लिम स्त्रियांना न्याय हक्क मिळतील असे कायदे करण्याचे धाडस केले नाही. उलट मुस्लिम सनातनी धर्मशास्त्रींच्या प्रतिगामित्वाला त्यांनी पोसले. १९८५ मध्ये शाहबानु खटल्याचा निकाल लागला. न्यायालयाने शाहबानु या तलाक पिडीत मुस्लिम स्त्रीला पोटगी द्यावी असा निर्णय दिला. परंतु हा निर्णय सनातनी मुस्लिम मंडळींच्या तीव्र प्रतिक्रिया उमटताच त्यावेळच्या राजीव गांधी सरकारने आपल्या पक्षाच्या बहुमताच्या जोरावर कायदा करून मुस्लिम स्त्रीला पोटगी नाकारणारा कायदा केला. तथाकथीत धर्मनिरपेक्ष व पुरोगामी राजकीय नेतृत्वांचे हे प्रतिगामीत्वच म्हणावे लागते. त्यामुळे या समाजाच्या आधुनिकीकरणामध्ये अडथळे निर्माण होतात.

३) <u>धर्मचिकित्सेला वाव नाही</u> :

धर्मचिकित्सा म्हणजे धर्मातील तत्वांचा सारासार विचार करून धर्मातील कालबाह्य आणि चिरंतन गोष्टी समाजाला सांगणे होय. इस्लाम हा परिपूर्ण धर्म समजला जातो. मुस्लिम धर्मांध मंडळी शरियत कायदे व अन्य न्यायशास्त्रांच्या माध्यमानेच समाजजीवन नियंत्रित व्हावे असे मानतात. त्यातील टाकावू काय आणि चिरंतन काय याचा विवेकबुद्धीने विचार करण्याची मानसिकताच ते बाळगत नाहीत. आणि धर्मचिकित्सेला कोणताही वाव देत नाहीत. मुस्लिम समाजाच्या आधुनिकतेमधील हा एक मुख्य अडसर आहे.

इस्लाम धर्मचिकित्सेबद्दल विचार केला असता प्रतिगामी मुस्लिम धर्मगुरूची भूमिका लक्षात घ्यावी लागते. इस्लामचा खरा अर्थ काही प्रतिगामी मुस्लिम धर्मगुरू सांगत नाहीत. कारण त्यामध्ये त्यांचे व्यक्तीगत स्वार्थ दडलेले असतात. त्यांचे महत्त्व आणि त्यांचा समाजावरील पगडा कमी होईल अशी त्यांना भीती असते. मुळात सर्वसामान्य मुस्लिम समाजाला अरबी व उर्दूचे ज्ञान नसते. त्यामुळे धर्माचा अर्थ समजावून घेण्यासाठी त्यांना उलेमा, कारी, मौलवींचा आधार घ्यावा लागतो. या

परिस्थितीचा उलेमा मंडळी फायदा उठवितात. आणि त्यांच्या परीने मध्ययुगीन चष्म्यातून धर्माचा ते अर्थ लावतात. सर्वसामान्यांना धर्माचा हाच खरा अर्थ आहे असा भ्रम होतो. उलेमा मंडळी धर्माचा अर्थ सांगत असताना इस्लामविषयी शंका घेणारा मुसलमान नसतो. हे सांगण्यास कधी विसरत नाहीत. प्रतिगामी धर्मगुरू मंडळींची ही चुकीची भूमिका असल्याने ईस्लामबद्दल साधक-बाधक चर्चा करणे म्हणजे धर्मविद्रोह आहे असा समज पसरतो. परिणामी धर्मचिकित्सेला वाव मिळत नाही. परंतु संपूर्ण मुस्लिम समाज कर्मठ मुस्लिम धर्मगुरूंच्या अधीन गेलेला आहे असे म्हणणे चुकीचे आहे. पण तबलीग चळवळीतील काही धर्मशास्त्री या समाजाला स्वत:च्या अधीन करण्याचा सतत प्रयत्न करताना दिसतात.

४) कालबाह्य प्रथांचे पुनरूज्जीवन :

मुस्लिम समाजातील प्रतिगामी शक्ती कालबाह्य प्रथांना कवटाळून बसलेल्या आहेत. ज्या त्या कालखंडात समाजजीवनाच्या गरजेतून ज्या प्रथा निर्माण होतात. त्या पुढे जशाच्या तशा समाजाला लागू करता येत नाहीत. कारण जूबानी तलाक, परदा पद्धत, बहुपत्नीत्व, शरियतमधील कालबाह्य कायदे (चोरी, व्यभिचार, खुन यांच्याशी संबंधीत) अशा अनेक प्रथा या टाकावू आहेत. त्याचे पुनरूज्जीवन करण्यात काहीच हासिल होत नाही. तरीही तबलीग सारखे संघटन हे काम करतच असते. दैनंदिन जबाबदाऱ्या टाकून चार-चार महिने धार्मिक कार्यात निघणे हे त्यांना पुंण्याचे काम वाटते. धर्म कोणत्याही वाईट गोष्टीची शिकवण देत नाही. परंतु धर्माच्या नावाने भ्रम पसरविला जावू नये. तबलीग जमाती लोक किती तास वाया घालवतात याचे परीक्षण केल्यास दैनंदिन काम कमी परंतु धर्मादाय काम जास्त दिसेल. मग हा समाज मागास का राहणार नाही? मुस्लिम समाजाने धर्मांध मातेफिरू लोकांच्या नादी न लागता दैनंदिन कामात लक्ष दिले तर, भौतिक सुधारणा होण्यास मदत होईल. परंतु तबलीग सारखे संघटन इहलौकीक जीवनाला खरे जीवन मानीत नाहीत तर, मृत्यू नंतर

(अखीरत की जिंदगी) ला खरे जीवन मानीत असल्याने इलौकीक जीवन दारिद्र्यात कंठले तरी त्यांना त्याचे स्वैरसूतक वाटत नाही. हा खरा मुस्लिम समाजाच्या विकासातील आणि आधुनिकतेमधील अडथळा आहे.

इस्लामची चिकित्सा करून धर्माच्या नावाखाली ज्या कालबाह्य आणि विद्रुप प्रथा, परंपरा, रूढी निर्माण झालेल्या आहेत त्या टाकून देवून धर्माकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन बदलून भारतीय मुस्लिम समाजाने धर्माकडे पाहण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगावा अशी भूमिका दलवाई यांनी मांडलेली आहे. मध्ययुगीन कालबाह्य प्रथा परंपरांचा त्याग केल्यास मुस्लिम समाज आधुनिकतेकडे वाटचाल करू शकतो. कालबाह्य प्रथा या टाकावू स्वरूपाच्या असतात. मध्ययुगीन रंजक मिथके उभा करून त्या प्रथांचे पुनरूज्जीवन करणे म्हणजे मुस्लिम समाजाच्या आधुनिकतेच्या मार्गात अडथळा आणण्याचा प्रकार आहे अशी भूमिका कालबाह्य प्रथांबद्दल दलवाई यांची होती.

**हमीद दलवाई यांचा जीवन परिचय :**

राजकीय आणि समाजिक सुधारणांची प्रदीर्घ परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राने अनेक सुधारकांना जन्म दिला. हमीद दलवाई त्या सुधारकांपैकी एक होते. हमीद दलवाई यांचा जन्म २९ सप्टेंबर १९३२ रोजी रत्नागिरी मधील चिपळूण तालुक्यातील 'मिरजोळी' गावी झाला. त्यांचे मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण 'चिपळूण' तालुक्यात झाले. इ.स. १९५१ मध्ये ते मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचे पुढचे शिक्षण इस्माईल युसूफ कॉलेज आणि रूपारेल कॉलेज, मुंबई मध्ये झाले. हमीद दलवाई राष्ट्र सेवा दलाचे कार्यकर्ते होते तसेच ते समाजवादी पक्षाशीही त्यांचा जवळचा संबंध होता.

हमीद दलवाई सर्जनशील लेखक होते. त्यांनी 'मौज', 'वसुधा', 'सत्यकथा' इत्यादी प्रकाशनामधून कथालेखन केले. 'साधना' प्रकाशनाने इ.स. १९६० साली त्यांचा 'लाट' हा कथासंग्रह प्रसिद्ध केला. इ.स. १९६६ साली 'मौज' प्रकाशनाने त्यांची 'इंधन'

कांदबरी प्रकाशित केली. 'इंधन' मध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजजीवन कसे बदलत गेले. 'मिरजोळी' गावामध्ये हिंदू-मुस्लिम जातीय तणाव कसा वाढला आणि गावातील लोकांनी या संघर्षाला कसे तोंड दिले याची वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. इंधन कांदबरीस इ.स. १९६६ चा राज्यपुरस्कार मिळाला. त्यांची 'इंधन' कादंबरी याच शिर्षकाखाली हिंदी भाषेमध्ये अनुवादीत झालेली आहे.

हमीद दलवाई यांच्या राजकीय आणि समाजिक लिखानामध्ये इ.स. १९६८ साली 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप, कारणे व उपाय, १९७० साली' 'Muslim Politics in Secular India' आणि इ.स. १९८२ साली 'इस्लामचे भारतीय चित्र' तसेच त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या हस्तलिखिताच्या आधरे 'राष्ट्रीय एकात्मता' आणि 'भारतीय मुसलमान' या शिर्षकाखाली त्यांच्या पत्नी मेहरून्निसा दलवाई आणि श्री. ग. प्र. प्रधान यांच्या सहकार्याने 'साधना' प्रकाशनाने १ मे २००२ रोजी पुस्तक प्रसिद्ध केले. दलवाई यांनी विविध लेखातून आपले विचार मांडले. त्यासाठी वेगवेगळी मासिके, नियतकालिक, दैनंदिन वर्तमान पत्रातून विविध लेख लिहिले. प्रामुख्याने त्यांनी 'The Quest', 'Secularist', 'Times of India', 'Organizer', 'Indian Express', 'मराठा', 'महाराष्ट्र टाईम्स' तसेच 'साधना' मधून लिखान केले. सन १९५८ ते १९६३ या कालखंडात दलवाई यांनी 'मराठा' मधून पत्रकारितेचे काम पाहिले. 'मराठा' चे त्यावेळचे संपादक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या व्यक्तीमत्वाचा आणि संभाषण कौशल्यांचा प्रभाव हमीद दलवाई यांच्यावर पडला. हमीद दलवाई ज्यावेळी राजकीय व सामाजिक कार्यासाठी पूर्ण वेळ काम करू लागले. त्यावेळी त्यांना पत्रकारितेची नोकरी सोडावी लागली. त्यांचे लेखन साहित्य थांबले. परंतु समाजप्रबोधनपर लिखाण सुरू झाले.

हमीद दलवाई ईहवादी होते. ईश्वराला ते मानीत नव्हते. परंतू ईश्वराबद्दलची त्यांची धारणा व्यक्तीगत होती. त्यांची ही भूमिका त्यांनी इतरावर लादण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. हमीद दलवाई यांनी सन १९६६ मध्ये तलाक पिडीत सात महिलांचा

मोर्चा काढून सामाजिक, राजकीय कार्यास सुरूवात केली. सन १९६६ मध्ये त्यांनी 'इंडियन सेक्युलर सोसायटी'च्या स्थापनेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. मुस्लिम समाज प्रबोधनासाठी आणि मुस्लिम मनाचा वेध घेण्यासाठी ते भारतभर फिरले.

१९७६ मध्ये अमेरिकेत 'वर्ल्ड युनिटी कॉन्फरन्स' भरली. हमीद दलवाई त्या परिषदेत प्रतिनीधी म्हणून उपस्थित होते. हमीद दलवाई यांनी इंग्लड, फ्रान्स, जर्मनी इत्यादी देशांना भेटी दिल्या. मुस्लिम समाजामध्ये आधुनिकता आणणे, धर्मनिरपेक्षतेचे मूल्य त्यांच्यामध्ये सक्षमतेने रूजविणे, राष्ट्रीय एकात्मता दृढ करणे, हिंदू-मुस्लिम जातीवाद मिटवून जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला.

हमीद दलवाई यांना मुस्लिम समाज प्रबोधनासाठी मुस्लिम पुरोगामी लोकांचे संघटन आवश्यक वाटत होते. त्यासाठी त्यांनी पुण्यातील काही पुरोगामी मंडळीच्या मदतीने २२ मार्च १९७० रोजी मुस्लिम सत्यशोधक मंडळाची स्थापना केली. हमीद दलवाई ईहवादी होते परंतु त्यांना मुस्लिम संस्कृतीचा अभिमान होता. त्यांच्या मते "भारतातील मुस्लिम संस्कृतीने मला घडविले आहे. ह्या संस्कृतीने ज्या चांगल्या गोष्टी केल्या आहेत. त्याचा मला अभिमान आहे आणि ज्या विद्रुप गोष्टी तीत आहेत त्या बदलल्या पाहिजेत."[२८]

हमीद दलवाई यांना मुत्रपिंडाचा आजार होता. त्यांच्या आजारपणात विद्यमान केंद्रीय कृषीमंत्री मा. शरद पवार यांचे बहुमोल सहकार्य लाभले. हमीद दलवाई यांच्या वर शस्त्रक्रिया करून कृत्रिम मुत्रपिंड बसविण्यात आले. परंतु त्यांच्या शरीराने कृत्रिम मुत्रपिंड नाकारले. या आजारपणामुळे दलवाई यांची प्रकृति खालावली अखेर ३ मे १९७७ साली हमीद दलवाई यांचा मृत्यू झाला. परंतु त्यांच्या कार्याने समाजाला नवा दृष्टीकोन दिला. तो समाजाला सतत प्रेरणा देणारा आहे.

ब)

आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहता १९९० नंतर हिंदु-मुस्लिम जमातवाद वाढत चालल्याचा दिसतो. अयोध्या प्रश्नी बाबरी मस्जिदचा विध्वंस आणि त्यानंतर उसळलेल्या जातीय दंगली तसेच नजीकच्याच काळात गुजरात मधील हिंदू-मुस्लिम जातीय दंगली. या भारत देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हान उभ्या करणाऱ्या घटना आहेत. हिंदू-मुस्लिम वाढता तणाव आणि मुस्लिम समाजामध्ये अकारण बहुसंख्य हिंदूपासून असुरक्षिततेची मानसिकता ही दोन्ही समाजात जातीय सलोखा बिघडविणारी आहे. त्याच बरोबर हिंदू-मुस्लिम समुदायातील काही धर्मांध शक्तीनी नजीकच्या काळात कमालीचा आपपरभाव पोसलेला दिसतो. त्याच्या जोडीला जमातवादी राजकारणाची वाढती प्रवृत्ती या सर्व घटकांचा विचार केला असता. हिंदू-मुस्लिम ऐक्याला धोका निर्माण झाल्याचे दिसते. हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय ऐक्य निर्माण व्हावे, मुस्लिम समाजाने अधिक धर्मनिरपेक्ष का होणे आवश्यक आहे, याबद्दल महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. त्यांनी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या माध्यमाने मुस्लिम समाजात आधुनिकतेची परंपरा घालून देण्याचा प्रयत्न केला. म्हणून आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहता त्यांचे राजकीय व सामाजिक विचार महत्त्वाचे आहेत म्हणून या पार्श्वभूमीवर प्रस्तुत विषयाचा अभ्यास हाती घेण्यात आलेला आहे.

**समस्या विधान : (Statement of Problem)**

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. काळानुसार समाजाला बदलने गरजेचे असते. त्यासाठी कालबाह्य झालेल्या प्रथा, परंपरा यांना सामाजिक, राजकीय जीवनातून हद्दपार करावे लागते. हमीद दलवाई यांनी धार्मिक मूलतत्ववादाला आव्हान दिले. परंतु दलवाई यांच्या पुरोगामी, सुधारणावादी विचारांना भारतातील प्रचलित समाजव्यवस्थेतील धार्मिक मूलतत्ववाद्यांनी विरोध केला. तो आजही कायम आहे. ज्यामुळे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेस आणि धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेसमोर मोठे आव्हान उभे राहिलेले आहे.

**संशोधनाचा हेतू : (Objectives of Study)**

१) हमीद दलवाई यांच्या जीवनकार्याची ओळख करून घेणे.

२) हमीद दलवाई यांच्या राजकीय, सामाजिक प्रबोधनाच्या कार्याची ओळख करून घेणे.

३) हमीद दलवाई यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या विचारांचा अभ्यास करणे.

४) हमीद दलवाई यांच्या सामाजिक, राजकीय सुधारणावादी विचारांची पडताळणी आणि पुर्नपरिक्षण करणे व त्यांच्या विचारांची समाकालिन प्रस्तुतता तपासणे.

**गृहितके : (Hyphothesis)**

१) आजची राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहता हमीद दलवाई यांच्या राजकीय व सामाजिक विचारांची समकालीन प्रस्तुतता अत्यावश्यक आहे.

२) हमीद दलवाई यांच्या राजकीय व सामाजिक विचारांमुळे मुस्लिम समुदायात विशेषत: महिला वर्गात आपल्या हक्काविषयी जाणीव-जागृती झाली.

३) मुस्लिम समाजात राजकीय जागृती झाली.

४) हमीद दलवाई यांच्या विचाराने मुस्लिम समाजामध्ये धार्मिवचिकित्सेचा आणि सुधारणावादी प्रक्रियेचा पाया घातला गेला.

**संशोधन पद्धती : (Research Methodology)**

प्रस्तुत विषयासंबंधी माहिती प्रकाशित व अप्रकाशित ग्रंथाच्या स्वरूपात उपलब्ध आहे. प्रस्तुत शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. त्यासाठी अभ्यासाच्या प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला गेला.

<u>प्राथमिक स्त्रोत</u> :

प्राथमिक स्त्रोतामध्ये हमीद दलवाई यांनी लिहिलेले विविध ग्रंथ, लेख, मुस्लिम सत्यशोधक पत्रिका, हमीद दलवाई यांनी घेतलेले विविध कार्यक्रम, पत्रांचा आधार घेतला गेला.

दुय्यम स्त्रोत :

दुय्यम स्त्रोतांमध्ये दैनंदिन वर्तमान पत्रातील विविध हिंदू-मुस्लिम प्रश्नांवरील लेख, विविध पुस्तिका, संदर्भ ग्रंथ, मासिके, नियतकालिके, दिवाळी अंक, नोंदी, टिकाकारांची मते इत्यादी प्राथमिक व दुय्यम साधणांचा आधार घेतला गेला.

**प्रस्तुत विषयासंबंधीच्या साहित्याचा आढावा : (Review of Literature)**

प्रस्तुत विषयसंबंधी विविध ग्रंथामधून संशोधन झालेले आहे. त्यामध्ये पुढील ग्रंथांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) दलवाई हमीद - 'मुस्लिम जातीयतेचे स्वरूप, कारणे व उपाय' :

प्रस्तुत ग्रंथामधून फाळणीच्या कारणांचा आणि मुस्लिम जातीयतेच्या स्वरूपाचा आढावा घेतलेला आहे. भारतीय मुसलमानांच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोरील मुख्य अडचणीवर प्रकाश टाकलेला आहे. त्यांच्या मते हिंदू-मुस्लिम बुद्धीजीवींमध्ये फरक आहे. "मुस्लिम मनाला अंतर्मुख बनण्याची पात्रता लाभलेली नाही, हिंदू बुद्धीजीवी वर्गाने ही क्षमता काही प्रमाणात कमावलेली आहे. हिंदू बुद्धीजीवी वर्गातील काही मंडळी गोहत्याबंदीसारख्या धार्मिक आंदोलनाकडेही बुद्धीजीवी दृष्टीकोनातून पाहतात. बुद्धीजीवी दृष्टीकोनातून एखाद्या समस्येकडे पाहणे हे खऱ्या बुद्धीवाद्याचे लक्षण मानले पाहिजे. हाच निष्कर्ष मुस्लिम बुद्धीवाद्यांना लावला तर निराशा पदरात पडेल. मुस्लिम बुद्धीवादी खऱ्या अर्थाने बुद्धीवादी नाहीत." ते पुढे म्हणतात "मुसलमानांनी पाकिस्तानची मागणी का केली? कारण आपला समाज हे एक वेगळे राष्ट्र आहे असे ते मानत होते म्हणून! ते जीनांच्या मागे का गेले? कारण जीनांनी घेतलेल्या हिंदूविरोधी भूमिकेने त्यांना आकर्षित केले म्हणून जीना जोवर द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडत नव्हते तोवर मुसलमानांनी जीनांचे नेतृत्व मानले नव्हते." मुस्लिम जातीयतेची अनेक उदाहरणे दलवाई यांनी दिली. शेवटी त्यावर उपाय सुचविले. त्यांच्या मते "हिंदू जातीयवाद मुस्लिम जातीयवादाला प्रत्युत्तर देण्याच्या स्वरूपात निर्माण झाला. हिंदू जातीयवाद

असण्याची कारणे नष्ट केल्यास हिंदू जातीवाद मुठभर देखील असणार नाही.'' मुस्लिम जातीयवाद नष्ट करण्यासाठी हिंदू सनातनीपणा कमी कमी होत जाणे, जाती नष्ट होणे, सामाजिक समतेच्या आणि मानवतेच्या मूलभूत कसोटीवर आधारलेल्या समाजाकडे चालू असलेली हिंदूंची वाटचाल अधिक जोरात होणे, हिंदू खऱ्या अर्थाने आधुनिकतेचा स्वीकार करीत असलेला दिसणे हे उपाय आहेत. पुढे ते म्हणतात दुर्देवाने हा मनाचा समतोल हिंदू मनाने बाळगलेला नाही. अर्थात दलवाई यांना हिंदू समाजाने अधिक आधुनिकता स्वीकारल्यास मुस्लिम जातीयवाद नष्ट होईल असे सुचवायचे आहे. शेवटी जातीयवादावर त्यांनी मानवतावादी आधुनिकता हाच एकमेव उपाय सुचविलेला आहे.[२९]

**दलवाई हमीद – 'ईस्लामचे भारतीय चित्र' :**

ईस्लामचे भारतीय चित्र या ग्रंथामध्ये हमीद दलवाई यांनी 'मराठा' दैनिकात सन १९६८ मध्ये जे त्यांचे लेख क्रमाने प्रसिद्ध झाले त्यांना एकत्रित करून या ग्रंथाची निर्मिती झाली. भारतामध्ये ईस्लाम चे चित्रण करणारे हे एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. त्यामध्ये हमीद दलवाई भारतभर फिरत प्रत्येक ठिकाणी दलवाई मुस्लिम मनाची मानसिकता जाणून घेण्याचा प्रयत्न करत. त्यांना आलेल्या अनुभवाचा आणि ईस्लामचे संपूर्ण भारतभर फिरताना जे चित्र त्यांच्या दृष्टीकोनातून दिसले त्या विसंगतीचे वेगवेगळे अनुभव त्यांनी प्रस्तुत ग्रंथात मांडलेले आहेत.[३०]

**दलवाई हमीद – 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान :**

प्रस्तुत ग्रंथामध्ये हमीद दलवाई यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मुस्लिम राजकारणाची चिकित्सा केली. इस्लामचा भारतामध्ये प्रसार कसा झाला. ब्रिटिशांनी मुसलमानांची सत्ता हातात घेतल्यानंतर परंपरावादी धर्मगूरूंची मने कशी भारावली गेली. त्या मानसिकतेतून आधुनिक भारतात मुस्लिम पुनरूत्थानवादी चळवळींचा जन्म कसा झाला याबाबत विवेचन केलेले आहे. मुस्लिम समाजात जातीयवाद कसा वाढत गेला. अंतिमत: सर सय्यद पासून जीना पर्यंत

मुस्लिम नेत्यांनी मुस्लिम अलगतावाद कसा जोपासला. भारताच्या फाळणीस जे घटक कारणीभूत होते. याची वस्तुनिष्ठ मांडणी त्यांनी केलेली आहे. तसेच हमीद दलवाई यांनी हिंदू-राष्ट्रवादाचीही चिकित्सा केलेली आहे. हिंदू-मुस्लिम समाजातील वाढत्या जमातवादाने भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेस कसे आव्हान उभे केले याची मांडणी केलेली आहे.[३१]

**इंडियन सेक्यूलर सोसायटी - 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका' :**

'इंडियन सेक्युलर सोसायटी'ने प्रकाशित केलेल्या या ग्रंथामध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाची उद्दिष्ट्ये आणि भूमिकेशी सर्वसामान्य वाचकाचा परिचय करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. मुस्लिम समाजातील कालबाह्य प्रथांचे उच्चाटन करणे, धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करणे, समान नागरी कायद्याला पाठींबा देणे, मुस्लिम जातीयवाद नष्ट करणे, मुस्लिमांच्या भाषेची समस्या सोडविणे, मुस्लिम समाजाला आधुनिक बनविणे, इत्यादी मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या उद्दिष्टांचा सविस्तर आढावा प्रस्तुत ग्रंथातून घेण्यात आलेला आहे.[३२]

**मुस्लिम सत्यशोधक मंडळ - मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचालः**

प्रस्तुत ग्रंथामध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासून (२२ मार्च १९७०) मंडळाच्या दोन दशकातील कार्याचा आढावा घेतला गेलेला आहे. तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाने मुस्लिम समाजप्रबोधनासाठी ज्या परिषदा, परिसंवाद, मोर्चे काढले या सर्व कार्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.[३३]

**जमादार हुसेन - 'मुस्लिम मनाचा कानोसा' :**

हुसेन जमादार लिखित प्रस्तुत पुस्तकामध्ये मुस्लिम मानसिकतेचा अभ्यास केला गेलेला आहे. हुसेन जमादार यांनी सर सय्यद अहमद यांनी मुस्लिम समाजसुधारणेसाठी जे कार्य केले याचा उल्लेख केलेला आहे. तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेतलेला आहे. मुस्लिम समाजाच्या भाषा निवडीच्या प्रश्नाबाबत विवेचन केलेले आहे.[३४]

**जमादार हुसेन – 'जिहाद' :**

हुसेन जमादार यांनी प्रस्तुत ग्रंथामधून मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या इतिहासाची वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. प्रस्तुत ग्रंथात मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या विविध उपक्रमाबद्दल माहिती त्यांनी दिलेली आहे.[३५]

**आचार्य जावडेकर – 'हिंदू-मुस्लिम ऐक्य' :**

प्रस्तुत ग्रंथामधून आचार्य जावडेकर यांनी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे विवेचन केलेले आहे. आचार्य जावडेकर यांच्या मते भारतामध्ये भिन्नता असली तरी राष्ट्रभावना फार प्राचीन काळापासून आहे. पुढे ते म्हणतात धर्मविशिष्ठ राष्ट्रवाद ही एक मध्ययुगीन विचारसरणी आहे. तिच्या आधारे तत्कालीन भारतीय राजकारणाचा प्रश्न सुटू शकला नाही. व ती विचारसरणी ते मागे टाकू शकले नाहीत, हे त्यांच्या सांस्कृतिक मागासपणाचे एक चिन्ह आहे व त्यांच्या सद्यःकालीन पारतंत्र्याचे एक प्रमूख कारण आहे. हे सांस्कृतिक मागासलेपणाचे चिन्ह पुसून टाकल्यावाचून यापुढेही उद्धार होणार नाही. शेवटी ते म्हणतात हिंदूंची जातिभेदी वृत्ती व मुसलमानांची धर्मभेदी वृत्ती या त्यांच्या सांस्कृतिक विकासास आज अडथळा करीत आहेत, हे जाणून हिंदूंनी व मुसलमानांनी जातिभेदाचे व धर्मभेदी राष्ट्रवृत्तीचे आज समूळ उच्चाटन करण्यास सरसावले पाहिजे. भारताचे भवितव्य हिंदू-मुसलमानांच्या ऐक्यावर व एकराष्ट्रभावनेवर अवलंबून आहे. भारतीय संस्कृतीच्या प्रभावी शक्तीचीही कसोटी या प्रश्नाच्या उत्तरावर लागणार आहे.[३६]

**बंदारे एम. एम. – 'महात्मा गांधी आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य' :**

प्रस्तुत एम.फिल. अप्रकाशित शोध प्रबंधामध्ये एम.एम. बंदारे यांनी फाळणी प्रसंगी घडलेल्या जातीय दंगली आणि महात्मा गांधीजींनी अवलंबलेल्या हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या भूमिकेचे वस्तुनिष्ठ परिक्षण केलेले आहे. जातीय दंगली शमविण्यासाठी गांधीनी बजावलेली भूमिका व त्याच्या यशापयशाचे परीक्षण केलेले आहे. आणि हिंदू-मुस्लिम ऐक्यामध्ये म. गांधीजींनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असा निष्कर्ष काढला.[३७]

**मुकादम अ. का. – 'दास्तान भारतीय मुसलमानांची' :**

प्रस्तुत पुस्तकात अब्दुल कादर मुकादम यांनी 'आपलं महानगर' या मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांतून 'दास्तान' नावाचे जे सदर चालविले या सदरातील निवडक लेखांचे संकलन आहे. इंग्रजी राजवटीच्या कालखंडात ब्रिटिशांनी हिंदू-मुस्लिम द्वेष पसरविला व विभाजनवादी धोरण अवलंबिले. इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम सुप्त संघर्ष उभा केला. त्यातून भारतातील अभिजन वर्गाने ब्रिटिशाकडून सवलती मिळविण्यासाठी ब्रिटिश धार्जिनेपणा अवलंबला. अभिजनांनी गरीब भारतीयांच्या विकासाकडे लक्ष दिले नाही. भारताची फाळणी अभिजनवाद्यांचे आंदोलन होते. सर्वसामान्य भारतीयांचे व्यवहार नित्यनियमाचे होते. त्यामुळे सर्वसामान्य गरीब भारतीय फाळणी विरोधी होता. हिंदुत्ववादी शक्तीनी कमालीचा मुस्लिमद्वेष पसरविला. भारतीय मुस्लिम समाजात् एक न्युनगंड आणि अकारण असुरक्षिततेची मानसिकता निर्माण झाली. त्यातुन जातीवादी दंगे उसळले. मुस्लिम समाजाच्या मानसिकतेचा आढावा प्रस्तुत ग्रंथातून अ. का. मुकादम यांनी घेतलेला आहे. प्रस्तुत पुस्तकामधून भारतीय मुस्लिमांच्या विविध प्रश्नावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. मुस्लिम समाजातील बदलत्या प्रवाहांचा आणि पुरोगामी चळवळींचा आढावा घेतलेला आहे. हिंदू-मुस्लिम, हिंदू-ख्रिश्चन, हिंदू -बौद्ध, हिंदू-शीख, स्वकीय परप्रांतीय इत्यादी भेदाभेद, निग्रह पूर्वक संपुष्टात आणल्यास आपण आपल्याला शाश्वती देऊ शकू असे या ग्रंथात त्यांनी म्हटलेले आहे.[३८]

**प्रा. बेन्नुर एफ. एच. – 'भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता' :**

प्रस्तुत पुस्तिकेमधून डॉ. एफ. एच. बेन्नुर यांनी भारतीय मुस्लिम समाजाच्या समाजरचनेची आणि मानसिकतेची वस्तुनिष्ठ मांडणी केलेली आहे. त्यांच्या मते हिंदू-मुस्लिम धर्मांध मंडळी परस्परावर तेच ते आरोप करतात. त्यातील तथ्यं तपासल्यास त्यामधील फोलपणा दिसून येतो. असा जातीवाद राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर

वाढत आहे. तसेच भारतातील हिंदू-मुस्लिम परस्पर द्वेष वाढला आहे. सर्वसामान्य मुस्लिम समाजाच्या खऱ्याखुऱ्या सामाजिक, राजकीय स्थितीचा आढावा त्यांनी घेतलेला आहे. त्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील परिस्थितीचा आढावा घेतलेला आहे.[३९]

**पळशीकर वसंत – 'जमातवाद राष्ट्र धर्म आणि धर्मनिरपेक्षता' :**

प्रस्तुत ग्रंथामध्ये प्रा. वसंत पळशीकर यांनी जमातवादाची कारणे स्पष्ट केलेली आहेत. वाढता जमातवाद भारतीय राष्ट्रीय एकात्मता आणि धर्मनिरपेक्षतेला घातक आहे असे त्यांनी मत मांडलेले आहे.[४०]

**Dr. Kazi B. T. – 'A Study of the Muslim satyashodhak Mandal, as a Social Reform Movement in Maharashtra' :**

प्रस्तुत अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंधामध्ये मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचा महाराष्ट्राच्या समाज प्रबोधन चळवळीवर काय परिणाम झाला याचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच मुस्लिम सत्यशोधक मंडळाच्या संपूर्ण कार्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्यात आलेला आहे.[४१]

**प्रकरण योजना :**

प्रस्तुत शोध प्रबंध खालील पाच प्रकरणामध्ये विभागला गेलेला आहे.

१) प्रस्तावना

२) मुस्लिम सत्यशोधक मंडळ स्थापना आणि कार्य

३) हमीद दलवाई यांचे राजकीय व सामाजिक आणि धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार

४) हमीद दलवाई यांच्या विचारांचे टिकात्मक परीक्षण आणि समकालीन प्रस्तुतता

५) उपसंहार

## संदर्भ ग्रंथ


१) मराठी विश्वकोश – *'महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ'*, खंड-१३वे, पृ. क्र. ७६८.

२) वंद्योपाध्याय शैलेशकुमार – *'दंगो का इतिहास'*, अनु. शिला रॉय, प्रकाशन, मार्च २०००, पृ. क्र. १४,१५.

३) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, शनिवारपेठ, पुणे, १ मे २००२, पृ. क्र. ०६.

४) उक्त – पृ. क्र. ०६.

५) उक्त – पृ. क्र. ०९.

६) प्रा. डॉ. बेन्नुर एफ. एच. – *'मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता'*, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, अंक ५ व ६, १९९५, पृ. क्र. २०.

७) अभ्यंकर र. शि. – *'भारतीय समाजविज्ञान कोश'*, स. मा. गर्गे (संपा.), ज्ञानेश प्रकाशन, पुणे १९८७, पृ. क्र. ९०.

८) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, २००२, पृ. क्र. ११.

९) प्रा. डॉ. बेन्नुर एफ. एच. – *'आधुनिक भारतातील मुस्लिम विचारवंत'*, भूमि प्रकाशन, लातूर, पृ. क्र. २१.

१०) वंदोपाध्याय शैलेशकुमार – *'दंगो का इतिहास'*, अनु. शिला रॉय, प्रकाशन, २०००, पृ. क्र. १५२.

११) प्रो. डॉ. चौसाळकर अशोक – *'शहीद भगतसिंग जीवन व कार्य'*, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १३.

१२) प्रा. पाटील टी. एस. – *'प्रबोधन प्रकाशन ज्योती (लेख)'*, अंक - , २००३, पृ. क्र. १८.

१३) बंदारे एम. एम. – *'महात्मा गांधी आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य'*, अप्रकाशित एम.फिल. शोधप्रबंध, पृ. क्र. २५, २७.

१४) जमादार हुसेन / यदुनाथ थत्ते (संपा.) – *'मुस्लिम मनाचा कानोसा'*, मानसन्मान प्रकाशन, पुणे, पृ. क्र. १५.

१५) आ. जावडेकर स. द. आणि आ. भागवत स. ज. – *'हिंदू-मुस्लिम ऐक्य'*, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, पृ. क्र. ०४.

१६) प्रा. पळशिकर वसंत – *'जमादवाद राष्ट्र धर्म आणि धर्मनिरपेक्षता'*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. २५, २६, २७.

१७) उक्त – पृ. क्र. २७.

१८) आ. जावडेकर आणि आ. भागवत स. ज. – *'हिंदू-मुस्लिम ऐक्य'*, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पृ. क्र. ०४.

१९) दलवाई हमीद – *'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान'*, साधना प्रकाशन, १ मे २००२, पृ. क्र. ५७.

२०) Karandikar M. A. – '*Islam in Indian Transition to Modernity*', Humanist Review, Page No. 172.

२१) डॉ. बेन्नुर एफ. एच. – *'भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता'*, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, अंक ५ व ६, पृ. क्र. ६८, ६९.

२२) मुकादम अ. का. – *'दास्तान भारतीय मुसलमानांची'*, सर्वोदय फ्रेंड सेंटर, मुंबई, २०००, पृ. क्र. ०३.

२३) आलीम वकिल – *'स्वातंत्र्योत्तर मुस्लिम मानस'*, दै. लोकमत दिवाळी अंक (लेख), २००६, पृ. क्र. १३६.

२४) Savarkar V. D. – '*Hindutva*', Page No. 80 to 118. (प्रस्तुत उतारा मुकादम अ.का., यांच्या *'दास्तान भारतीय मुसलमानांची'* या ग्रंथातून उद्‌धृत, २००५, पृ.क्र. ०९)

२५) डॉ. बेन्नुर एफ. एच. – *'भारतीय मुसलमानांची समाजरचना आणि मानसिकता'*, प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, अंक-५-६, १९९५, पृ. क्र. ७७, ७८.

२६) मुकादम अ. का. – *'दास्तान भारतीय मुसलमानांची'*, सर्वोदय फ्रेंड सेंटर, मुंबई, २०००, पृ. क्र. ०३.

२७) उक्त – पृ. क्र. ३.

२८) प्रकाशक – इंडियन सेक्युलर सोसायटी – '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका*', द्वितीय आवृत्ती, पृ. क्र. १६.

२९) दलवाई हमीद – '*मुस्लिम जातीयतेचे स्वरूप, कारणे व उपाय*', १९६८.

३०) दलवाई हमीद – '*इस्लामचे भारतीय चित्र*', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८२.

३१) दलवाई हमीद – '*राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान*', साधना प्रकाशन, २००२.

३२) प्रकाशक – इंडियन सेक्युलर सोसायटी – '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ उद्देश व भूमिका*', १९८५.

३३) प्रकाशक – मुस्लिम सत्यशोधक मंडळ – '*मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल*', १९८९.

३४) जमादार हुसेन / यदुनाथ थत्ते (संपा.) – '*मुस्लिम मनाचा कानोसा*', मानसन्मान प्रकाशन, पुणे १९८६.

३५) जमादार हुसेन – '*जिहाद*', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३६) आ. जावडेकर स. द. व आ. भागवत स. ज. – '*हिंदू-मुस्लिम ऐक्य*', सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे.

३७) बंदारे एम. एम. – '*महात्मा गांधी आणि हिंदू-मुस्लिम ऐक्य*' एम.फिल. शोध प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३८) मुकादम अ. का. – '*दास्तान भारतीय मुसलमानांची*', सर्वोदय फ्रेंडशिप सेंटर, मुंबई, २००५.

३९) प्रा. बेन्नुर एफ. एच. – '*भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता*', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधिनी, खंड ५-६.

४०) प्रा. पळशीकर वसंत – '*जमातवाद राष्ट्र धर्म आणि धर्मनिरपेक्षता*', साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४१) Dr. Kazi B. T. – '*A Stdudy of Muslim Satyashodhak Mandal; as a Social Reform Movement in Maharashtra*', Un-published Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur.